


डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरि निर्वान दिनाला उपस्थित मान्यवर.




कर्मयोगी गाडगे बाबा पूण्यतिथी कार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना मा. भोयर सर, भंडारा, व उपस्थित मान्यवर.




वादविवाद स्पर्धेत आपले मत मांडतांना स्पर्धक




वक्तृत्व स्पर्धेत बोलतांना सहभागी स्पर्धक




'शिक्षक दिना' निमित्य विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. व्ही. दडवे व मंचकार उपस्थित प्रा. व्ही. एम. वकील व प्रा. आर. व्ही. तलमले




'शिक्षक दिनांनिमित्य 'आधुनिक काळातील शिक्षकांची भूमिका' विषयावर आयोजित 'वक्तृत्व स्पर्धेच्या विजेता अजय शहारे यांस ट्रॉफी प्रदान करतांना प्राचार्य डॉ. जे. व्ही. दडवे व प्रा. आर. व्ही. तलमले




रा. से. यो. च्या वतीने महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री जी च्या प्रतिमांना माल्यार्पण करतांना प्राचार्य पी. एम. ठाकरे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्य प्रतिमेला माल्यार्पन करतांना प्राचार्य, डॉ. जे. व्ही. दडवे प्रा. डॉ. के. वाय. ठाकरे, व इतर मान्यवर ~~प्राध्यापक~~




जागतीक महिला दिना- ~~निमित्य~~ मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे. व्ही. दडवे




बि. ए. भाग 3 व बि. कॉम. भाग-3, बि. एससी भाग-3 विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभा-प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना कु. जया नखाते




14.04.2016 07:56

तरुण भारत

मंगळवार, १ मार्च २०१६

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

लाखांदूर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग भंडारा तथा यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूरच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. प्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एम.ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून समाज कल्याण विभागाचे पी.ए.गणवीर, राकेश सुखदेवे, डी.जी.रंगारी, प्रशांत बडोले, अशोक सोनटक्के, एस.व्ही.बोथरे उपस्थित होते. प्रास्ताविकातून पी.ए.गणवीर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा व कार्याचा परिचय करून दिला.

यावेळी इतर मान्यवरांनीही समायोचित मार्गदर्शन केले. आयोजित स्पर्धेचे परीक्षण प्रा.आर.व्ही.तलमले, प्रा.एच.जी.बोरकर, प्रा.डॉ.आर.यू.गडपायले यांनी केले. स्पर्धेत महाविद्यालयातील अजय शहारे याने प्रथम व विद्या झोडे द्वितीय स्थान पटकाविले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना स्मृतिचिन्ह व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.संचालन प्रा.व्ही.बी.तुरकर व आभार प्रा.व्ही.एम.बरडे यांनी मानले. यशस्वीतेकरिता प्रा.राकेश वासनिक, प्रा.डॉ.आर.यू.ठाकरे, प्रा.डॉ.के.वाय.ठाकरे यांच्यासह सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

Scanned by CamScanner

सकाळ

१४ जानेवारी २०१६



लाखांदूर : स्पर्धेचे पुरस्कार देताना पी.एम. ठाकरे, डॉ. बळी व इतर.

## 'शिक्षणाचा अधिकार'वर वक्तृत्व स्पर्धा

लाखांदूर, ता. १३ : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात ६ जानेवारीला राज्यशास्त्र अभ्यास मंडळाअंतर्गत 'शिक्षणाचा अधिकार' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत बी. ए. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी अनुक्रमे अश्विनी टेंभूर्णे, बलवान गायकवाड, सुरेश अंडेल, अमोल राऊत, वैशाली हजारे, राहुल शिवणकर, करिश्मा पिंपळकर, रत्नदीप नंदागवळी, विद्या झोडे, शरद पिल्लेवान यांनी भाग घेतला. या स्पर्धेत विद्या झोडेला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले तर शरद पिल्लेवान द्वितीय बक्षिसाचा मानकरी झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. ठाकरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विनोद बळी, डॉ. किशोर ठाकरे, प्रा. भरत नखाते उपस्थित होते. संचालन प्रा. बी. व्ही. बोदेले यांनी केले. आभार प्रा. घोटे यांनी मानले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. तलमले व प्रा. तुरकर यांनी केले.

लोकमत | शनिवार दि. २३ जानेवारी २०१६

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, लाखांदूर



लाखांदूर : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य पी. एम. ठाकरे, प्रा. अनिल काणेकर, तत्वराज अंबादे गटशिक्षणाधिकारी, प्राचार्य हजारे, चौरे, प्रा. भोजराज बोदेले आदी उपस्थित होते. या निमित्त संविधानातील बदल योग्य अयोग्य या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्या झोडे ही प्रथम तर द्वितीय क्रमांक प्रणोली मेंढे हीने पटकाविला. वक्तृत्व स्पर्धेत डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला भारत या विषयावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक विद्या झोडे तर द्वितीय शैलेश पिल्लेवान याने पटकाविला. निबंध स्पर्धेत प्रथम स्वप्नील बोरकर, द्वितीय करिश्मा शाहारे तर तृतीय क्रमांक दीपाली धनविज हिने मिळविला. त्याच प्रमाणे या निमित्त परिसंवादावर मान्यवरांनी विचार व्यक्त केले. अशा

देशोन्नती

नागपूर / सोमवार, दि. १ डिसेंबर २०१४

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन!

शहर प्रतिनिधी / ३० नोव्हेंबर

लाखांदूर : स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये महात्मा फुले यांच्या १२४ व्या पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र आदरांजली वाहण्यात आली. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एम.ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.के.वाय ठाकरे व प्रा.बि.व्ही.नखाते मंचकावर उपस्थित होते.

महात्मा ज्योतीराव फुले आधुनिक युगातील महान क्रांतीकारक असून समाजाला ज्ञानाचा व विद्येचा मार्ग खुला करण्याकरीता त्यांचे कार्य उल्लेखनिय होते. १८४८ ला पुण्यामध्ये भिडेवाडा येथे महाराष्ट्रातील पहिली शाळा सुरु करुन सर्व जाती प्रजाती व समाजाला शिक्षीत करण्यास सुरुवात केली. आधुनिक युगातील नेत्रदिपक प्रगतीचे बिज त्यांच्यामुळेच रोवले गेले असल्याने आपण ज्ञान, विज्ञान व इतर क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात कार्य करु शकलो असे प्रतिपादन अध्यक्ष व उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा.राकेश वासनिक यांनी तर आभार प्रा.राकेश तलमले यांनी मानले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा.डी.एस.कुरंजेकर, प्रा बोदेले प्रा.व्ही.एम.बळी, प्रा.एच.जी.बोरकर, प्रा.एम.बी.वासेकर, प्रा.पी.के.गणवीर,प्रा.मेंढे, कुर्झेकर, वैद्य, भांडेकर, बन्सोड, मोहुर्ले, मेश्राम, धोटे, गोमासे व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी बुधवार, ३ डिसेंबर २०१४

# महात्मा फुले पुण्यतिथी

मेश्राम, भीमराव शेंडे, राहुल शेंडे, विद्येश मेश्राम, मंगला गायमुखे, शीला शेंडे, मंदा गायमुखे, सुनीता वाघमारे, सुष्मिता पिल्लेवान आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार जोगेंद्र बनकर यांनी मानले.

लाखांदूर - स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र आदरांजली वाहण्यात आली. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एम. ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. के वाय. ठाकरे व प्रा. बी.व्ही. नखाते मंचावर उपस्थित होते.

महात्मा फुले आधुनिक युगातील महान क्रांतिकारक असून समाजाला ज्ञानाचा व विद्येचा मार्ग त्यांनी खुला केला. आधुनिक युगातील नेत्रदीपक प्रगतीचे बीज त्यांनी रोवले, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. राकेश वासनिक यांनी तर आभार प्रा. राकेश तलमले यांनी मानले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. डी.एस. कुरंजेकर, प्रा. व्ही.एम. बळी, प्रा. एच.जी. बोरकर, प्रा. एम.बी. वासेकर, प्रा. गणवीर, प्रा. सौ. दहीकर, प्रा. लाडे, प्रा. बोदेले, प्रा.डॉ. धोटे, प्रा. मोटघरे, प्रा. बरडे, प्रा. तुरकर, प्रा. लांजेवार, प्रा. डा. ठाकरे, प्रा. गडपायले, प्रा. सुधीर मस्के, प्रा. बिसेन, प्रा. लेदाडे, प्रा. रोकडे, प्रा. वासनिक, प्रा. तलमले, प्रा. मेंढे, कुर्झेकर, वैद्य, भांडेकर, निंबेकर, बन्सोड, मोहुर्ले, मेश्राम, धोटे, मसराम, कु गोमासे व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned by CamScanner

शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०१४

## चव्हाण महाविद्यालयाचे रासेयो शिबिर

तालुका प्रतिनिधी/१६ जानेवारी

लाखांदूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ अंतर्गत येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वतीने स्त्री-पुरुष समानता व श्रमसंस्कार या विषयावर रासेयो शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबीर मागील ८ जाने. ते १४ जाने. दरम्यान तालुक्यातील चिचोली येथे आयोजित करण्यात आला होता. या शिबीराला संस्था सचिव किसनराव खोब्रागडे, डॉ.जे.व्ही.दडवे, सभापती नलू दोनाडकर, जि.प.सदस्या नलीनी खरकाटे, सुशिल खोब्रागडे, सरपंच आशा नैताम, व.दा.कापकर, उपसरपंच सोनकुसरे यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. सात दिवसीय या शिबीरात स्त्री-पुरुष समानता, जागर जाणीव व श्रमसंस्कार आदि विषयावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या शिबीराअंतर्गत सहभागी शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे जनजागृती केली. शिबीराचे प्रास्ताविक प्राचार्य पी.एल.ठाकरे यांनी केले. संचालन प्रा.बोदेले यांनी केले तर आभार शिबीर प्रमुख प्रा.बळी यांनी मानले.



रासेयो शिबीर उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर

बुधवार, ८ जानेवारी २०१४

**पुण्य नगरी**

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे रासेयो शिबिर

लाखांदूर
दि. ७ (प्रतिनिधी)

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे ७ दिवसीय श्रमसंस्कार शिबिर चिचोली येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन ९ जानेवारी रोजी जि. प. चे माजी अध्यक्ष अॅड. वसंत एंचिलवार यांच्या हस्ते होईल.

उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भाग्यवान खोब्रागडे तर प्रमुख अतिथी म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. जे. व्ही. दडवे, सभापती नलू दोनाडकर, ठाणेदार प्रशांत कुलकर्णी, बीडीओ विजय झिंगरे, जि. प. सदस्य नलिनी खरकाटे, सुनील खोब्रागडे, किसनराव खोब्रागडे, गोपालराव कोल्हटकर, टिकाराम बोरकर उपस्थित राहतील. शिबिरादरम्यान स्त्री- पुरूष समानता, जागर जाणिवांचा यासह विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

शिबिराला विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन शिबिरप्रमुख प्रा. बळी, प्राचार्य पी. एम. ठाकरे यांनी केले आहे.

लाखांदूर - येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. के. वाय. ठाकरे, प्रा. एच. जी. बोरकर उपस्थित होते. प्रारंभी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. विद्यार्थी व शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. सावित्रीबाई फुलेंच्या महान कार्यामुळेच खेड्यापाड्यात मुलींना शिक्षणाची संधी मिळून मोठ्या पदापर्यंत पोहोचता आले, असे मत प्राचार्य ठाकरे यांनी व्यक्त केले. प्रा. रिता राऊत यांनी प्रास्ताविक तर प्रा. के. झेड. लाडे यांनी संचालन केले. प्रा. बी. व्ही. बोदेले यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यास प्रा. डी. एस. कुरंजेकर, प्रा. व्ही. एम. बळी, प्रा. गणेश घोटे, प्रा. गणवीर, प्रा. मेंढे, प्रा. श्रीमती दहीकर, प्रा. तलमले, किशोर कुर्झेकर तसेच कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

Scanned by CamScanner